दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -३३१ | सोमवार,दि.०४ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-331 | Monday, Dt.04 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# वैद्यनाथ बँक निवडणुक ; ना. पंकजाताई मुंडेंचा परळीत मतदार, कार्यकर्त्यांशी संवाद

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या विजयाचा केला संकल्प

परळी । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज वैद्यनाथ नागरी सहकारी बँकेच्या निवडणुक प्रचारार्थ सभासद मतदार व कार्यकर्त्यांची बैठक घेऊन संवाद साधला. लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या विजयाचा संकल्प यावेळी करण्यात आला.

बँकेचे अध्यक्ष विनोद सामत यांच्या निवासस्थानी ना. पंकजाताई मुंडे यांनी सभासद मतदारांना संबोधित केले. चेअरमन विनोद सामत यांच्यासह व्हा. चेअरमन रमेश कराड, विकासराव डुबे, शांतीलाल जैन, जुगलकिशोर लोहिया, सूर्यभान मुंडे, सतीश मुंडे, वैजनाथ जगतकर, बाजीराव धर्माधिकारी, वैजनाथ सोळंके, माऊली फड आदी यावेळी उपस्थित होते.वैद्यनाथ बँकेविषयी आपल्या सर्वाच्याच मनात एक वेगळी भावना आहे, एक वेगळा आदर आहे. लोकनेते मुंडे साहेब यांनी बँकेच्या प्रगतीकडे सातत्याने लक्ष दिले. या भागाची आर्थिक उन्नती केली. परळीच्या प्रगतीत बँकेचा सिंहाचा वाटा आहे. बँकेला याहून अधिक यशोशिखरावर घेऊन जाण्यासाठी लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्यासाठी मेहनत घ्या असं आवाहन ना. पंकजाताईंनी केलं.




### चार उमेदवार बिनविरोध; १३ जागेसाठी १० तारखेला मतदान

वैद्यनाथ बँकेच्या १७ जागांसाठी ही निवडणूक होत असून लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलचे चार उमेदवार अगोदरच बिनविरोध निवडून आले आहेत, यात माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे, माधुरी मेनकुदळे, अनिल तांदळे व प्रा. विनोद जगतकर यांचा समावेश आहे. उर्वरित १३ जागांवर सर्वश्री विनोद सामत, रमेश कराड, प्रकाश जोशी, संदीप लाहोटी, डॉ राजाराम मुंडे, प्रवीण देशपांडे, महेश्वर निर्मळे, विजय वाकेकर, अमोल डुबे, कुलभूषण जैन, राजेंद्र लोमटे, सुशांत लोमटे, मनमोहन कलंत्री हे निवडणुक लढवत आहेत.



## महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या एक वर्ष कालावधी अभ्यासक्रमाच्या

# निकाल राखून ठेवलेल्या व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेण्यात येणार

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या जुलै २०२५ या सत्रातील एक वर्ष कालावधी अभ्यासक्रमाच्या निकाल राखून ठेवलेल्या व अनुत्तीर्ण विद्यार्थी यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी देण्यात आली आहे. कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन यासंदर्भात निर्देश दिले.महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या जुलै २०२५ सत्रातील २१५२ विद्यार्थ्यांना परीक्षेत नियमभंग केल्याच्या कारवाईत त्यांचे निकाल राखून ठेवण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या जुलै २०२५ सत्रातील परीक्षा -ख आधारित झ्रीलीशिव तंत्रज्ञान वापरून चउट स्वरूपात घेण्यात आल्या. ७ जुलै २०२५ रोजी परीक्षा संपल्यानंतर १७ जुलै २०२५ रोजी निकाल जाहीर करण्यात आला. या सत्रात ३६,२०१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यापैकी २१५२ विद्यार्थ्यांनी परीक्षा नियमभंग केल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे त्यांचे निकाल राखीव ठेवण्यात आले. त्यापूर्वी झालेल्या सराव परीक्षेत विद्यार्थ्यांना -ख सुरक्षा व झ्रील-ीशिव प्रणालीबद्दल संपूर्ण माहिती देण्यात आली होती. मात्र असे असतानाही परीक्षेत नियमभंग झाल्याचे आढळून आले होते. मंडळामार्फत प्रमाणपत्र, पदविका व प्रगत पदविका अभ्यासक्रम राबवले जातात. यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मिळतात. केवळ नियमभंग या कारणास्तव विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी महिनाभरात फेर परीक्षा घेण्याचे आदेश मंडळाला दिले आहेत. त्यानुसार, २३ ऑगस्ट २०२५ रोजी पुरवणी परीक्षा आयोजित केली जात आहे. राखीव निकाल असलेले व अनुत्तीर्ण विद्यार्थी यांना ही विशेष संधी दिली जात आहे.यापूर्वी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या सैद्धांतिक परीक्षा पारंपरिक स्वरुपात घेतल्या जात होत्या. या परीक्षांच्या निकालासाठी सुमारे २ महिने लागत होते. विद्यार्थ्यांचा वेळ वाचवा यासाठी मंडळाने अत्याधुनिक -ख झ्रील-ीशिव तंत्रज्ञान वापरून या परीक्षा चउट स्वरूपात घेण्याचा निर्णय घेतला होता. पारदर्शक पद्धतीने ही प्रक्रिया पार पाडली जात असून यासंदर्भात मंडळामार्फत विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शक सूचना दिल्या जातात.

# आंदोलनाचे शास्त्र शिवसैनिकांना कळले पाहिजे, आंदोलन करणे हे जिवंतपणाचे लक्षण आहे - सुषमा ताई अंधारे

## मन-मेंदू-मनगट या सर्वबाबी उल्हास गिराम यांच्या बाबतीत परिपूर्ण

बीड ।प्रतिनिधी

शिवसेना उपनेत्या तथा प्रवक्त्या सुषमाताई अंधारे यांनी आज जिल्हाप्रमुख उल्लास गिराम यांच्या जनसंपर्क कार्यालयास भेट दिली. आगामी निवडणुकी संदर्भात शिवसैनिकांशी सवांद साधला. ज्या ठिकाणी अन्याय, अत्याचार, सामान्य लोकांचे मूलभूत प्रश्न पायदळी तुडवली जातात तेव्हा लोकशाहीला साजेशी आंदोलने झाली पाहिजेत. शिवसैनिकांना आंदोलनाचे शास्त्र कळले पाहिजे, आंदोलन करणे जिवंतपणाचे लक्षण असल्याचे यावेळी सुषमा ताई अंधारे यांनी शिवसैनिकांना सांगितले. जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे कौतुक




सुषमाताईंनी केले. जिल्हाप्रमुख पदाच्या आजपर्यंतच्या कार्याची माहिती घेतली. शिवसैनिक व जिल्हाप्रमुख म्हणून मन - मेंदू - मनगट या सर्व बाबी उल्हास गिराम यांच्या बाबतीत परिपूर्ण असल्याचे ताईंनी सांगितले. दर वेळी हमारीतुंबरी वर येऊन शिवसैनिकांनी काम न करण्याचा सल्ला ही शिवसैनिकांना या वेळी सुषमा ताई अंधारे यांनी दिला.

नळ - गटार - रस्ते या तीन कामावर लक्ष केंद्रित करून आंदोलने करा. या पूर्वी संपूर्ण मराठवाड्यात आपण पाणी प्रश्नावर आंदोलने केली यांची दखल या सरकारला घ्यावी लागली असल्याचे ताई म्हणाल्या. यावेळी जिल्हाप्रमुखासह शिसैनिकांनी ताईचा आदर सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ शिवसैनिक तथा माजी पं. स. विलास महाराज शिंदे, महिला संघटिका मीराताई नवले, जिल्हा संघटक संजय महाद्वार,जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, जिल्हा संघटक नितीन धांडे, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे,उपजिल्हाप्रमुख अजिनाथ खेडकर,तालुकाप्रमुख सोपान काका मोरे, केज तालुकाप्रमुख अशोक जाधव, कामगार सेनेचे रवि वाघमारे, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे, पंकज कुटे, उपसरपंच प्रदीप कोटुळे, गणेश लोणकर, राजाभाऊ हुरकुडे, दादा साहेब सोनवणे, सतीश परदेशीं, दिलीप पवार

## कचरूलालजी बस्तीमलजी समदरीया यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

श्री जैन श्वेतांबर तेरापंथ धर्म संघाचे वरीष्ठ सुश्रावक ज्यांना आचार्य श्री महाप्रज्ञजी द्वारे श्रद्धानिष्ठ हे अलंकरण देण्यात आले होते. असे श्रीमान कचरूलालजी बस्तीमलजी समदरीया यांचे दि.०२/०८/२०२५ वार शनिवार दू ०१:३ मि. वाजता वृद्धापकाळाने वयाच्या ८८ व्या वर्षी बीड येथील त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या मागे त्यांच्या दोन भावांचा, पाच मुल, एक कन्या, नातु, पंतु असा समृद्ध व विशाल परीवार आहे.बीड मधील कापडाच्या व्यवसायातील शित्तल ग्रुपचे हे सर्वेसर्वा होते. यांच्या पार्थिवावर दि.०३/०८/२०२५ वार रविवार सकाळी १०:१५ मिनीटाने अंत्यसंस्कार, अमरधाम, मोंढा रोड, बीड येथे करण्यात आले.



# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या नावाची मुख्याध्यापक व संस्था चालक यांना ऍलर्जी आहे का ?

## जातीयवादी मानसिकता असलेले संस्थाचालक, मुख्याध्यापक यांच्यावर अट्रॉसिटी एक्ट नुसार गुन्हा दाखल करा - डॉ.संजय नाकालगावंकर

बीड ।प्रतिनिधी

आण्णाभाऊ साठे इंग्लिश स्कुल ही संस्था मौजे दिंदूड ता. माजलगांव जि.बीड या ठिकाणी कार्यरत नसून ती फक्त कागदोपत्रीचं दाखवण्याचा प्रयत्न आहे. सदरील संस्था हि दिलीप पारेकर यांची असुन याच ठिकाणी त्यांची अन्य अनधिकृत अमान्यता प्राप्त संस्था खोलेश्वर विद्यालय, दिंदूड आहे.साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या नावाची लाज वाटते की काय अशा प्रकारची संस्थेची वागणूक दिसत आहे.जातिवादी मानसिकता असलेल्या मुख्याध्यापक व संस्थाचालकावर ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करा. जसे की, विद्यार्थ्यांचे ओळखपत्र आण्णाभाऊ साठे इंग्लिश स्कूलचे न वापरता खोलेश्वर विद्यालयाचे वापरले जाते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना ने-आण करण्यासाठी ज्या बसेस आहेत त्यांनाही आण्णाभाऊ साठे इंग्लिश स्कुल नाव न वापरता खोलेश्वर विद्यालय असेच नाव बसेसवर वापरले जाते. विद्यार्थ्यांच्या गणवेशावरही आण्णाभाऊ साठे असे नाव न वापरता खोलेश्वर विद्यालय असेच नाव व लोगो आहे.सदरील परिस्थीती पाहता शाळेचे संस्थाचालक व शाळेचे मुख्याध्यापक हे जातीयवादी मानसिकतेचे आहेत काय? असा प्रश्न निर्माण होतो. साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांचे नाव वापरण्यास यांना एवढी का लाज वाटावी ही गंभीर बाब आहे. गटशिक्षणाधिकारी यांनी सदरील प्रकरणाची तात्काळ चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहिल याची नोंद या संस्थाचालक व मुख्याध्यापकावर कारवाई व्हावी यासाठी गटशिक्षणाधिकारी माजलगाव यांच्याकडून निवेदन देण्यात आले आहे.






# सरकारने गोहत्ये प्रमाणेच शेळी आणि कोंबड्यांची हत्या देखील बंद करावी

मुंबई /प्रतिनिधी

सरकारने गोहत्ये प्रमाणेच शेळी,मेंढी,कोंबड्या आणि अन्य कोणत्याही जिवाची हत्या देखील बंद करण्या बाबत कठोर कायदा लागू करून त्यांचे जीव देखील वाचवावते अशी मागणी पर्यावरण मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेब यांना रामटेक शासकीय निवासस्थानी प्रत्यक्ष भेट घेऊन करण्यात आली असल्याचे पत्रकार शेख आयेशा यांनी सांगितले.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, महाराष्ट्रामध्ये गोहत्या बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने मुस्लिम समाजाने मागील काही दिवसापासून आपली कत्तलखाने बंद केलेली आहेत. गोमास विक्री आणि खरेदी बंद असून जनावरांची कत्तल करणे देखील बंद केलेले आहे.आता महाराष्ट्र सरकारने गोमास हे जसे खरेदी आणि विक्री बंदचा निर्णय घेतला आहे त्याच प्रकारे मांस म्हणून आहारात वापरण्यासाठी शेळी, मेंढी, कोंबड्या, चित्तर आदिंसह काही वन्य प्राणी व पक्षी यांचा देखील सर्रास वापर करत आहेत. त्यांना देखील जीव असल्याने महाराष्ट्र सरकारने गोहत्या प्रमाणेच शेळी, मेंढी, कोंबड्या, चित्तर अथवा अन्य कोणत्याही जीव प्राण्यांची हत्या बंदी करण्याचा निर्णय कायदेशीर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब तसेच महाराष्ट्र सरकारला पर्यावरण मंत्री म्हणून आपण पुढाकार घ्यावा अशी निवेदनाद्वारे प्रत्यक्ष ताईसाहेबांना मुंबई येथील रामटेक शासकीय बंगल्यावर भेट घेऊन मागणी केली असल्याचे पत्रकार तथा आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांनी सांगितले.



# खेळाडूंना अधिकाधिक दर्जेदार व अद्ययावत सुविधा पुरविणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## जागतिक बुद्धिबळ स्पर्धा विश्वविजेती ग्रँडमास्टर दिव्या देशमुखचा नागरी सत्कार

नागपूर ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने क्रीडा क्षेत्राला कायम प्राधान्य दिले आहे. खेळाडूंना मोठी ध्येय खुणावत असून यासाठी तंत्रशुध्द प्रशिक्षण, सकस आहार, परदेशी प्रशिक्षकांचे मार्गदर्शन या गोष्टी आवश्यक आहे. जागतिक स्तरावरील स्पर्धांमध्ये यश मिळवायचे असल्यास या गोष्टी आवश्यक आहे. खेळाडूंना अधिकाधिक दर्जेदार व अद्ययावत सुविधा पुरविण्यात येत असून दिव्या देशमुखने जागतिक स्पर्धेत मिळविलेले देदीप्यमान यश हे देशातील हजारो मुला-मुलींसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आणि महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक बुद्धिबळ स्पर्धा विश्वविजेती ग्रँडमास्टर दिव्या देशमुख हिचा नागरी सत्कार कविवर्य सुरेश भट सभागृह येथे आयोजित करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दिव्याचा सन्मान करीत तीन कोटी रुपयांचे बक्षीस प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेकडूनही ११ लाख रुपयांचे बक्षिस प्रदान करण्यात आले. तसेच खासदार क्रीडा महोत्सव समितीकडूनही सन्मान करण्यात आला.क्रीडा व युवक कल्याण मंत्री ड. माणिकराव कोकाटे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, आमदार सर्वश्री संदीप जोशी, अभिजित वंजारी, प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष तथा आमदार डॉ. परिणय फुके, क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, क्रीडा व युवक सेवा आयुक्त शीतल तेली-उगले, पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, दिव्याचे वडील डॉ. जितेंद्र देशमुख, आई डॉ. नम्रता देशमुख, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेशी संलग्नित जिल्हा संघटनांचे पदाधिकारी, बुद्धिबळपटू, विद्यार्थी व नागपूरकर मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6x6.5

# वाचनाशिवाय समाज प्रगती अशक्य - उपलेखा अधिकारी किरणकुमार खिल्लारे

## तुलसी समूहातर्फे डॉ.अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन

बीड ।प्रतिनिधी

महापुरुषांचे विचार, त्यांची आत्मचरित्रं आणि ग्रंथ हे आपल्याला प्रेरणा देतात, आपल्या कृतीला योग्य दिशा दाखवतात. आजचा तरुण जर मोबाईलऐवजी पुस्तक हातात घेत असेल, केवळ मनोरंजनाऐवजी विचारांचा स्वीकार करत असेल, तरच समाजाचा प्रगतीचा आलेख खऱ्या अर्थाने वर जाईल, असे प्रतिपादन उपलेखा अधिकारी किरणकुमार खिल्लारे यांनी केले.

साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शनिवार, दि.२ रोजी तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून ते मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य श्यामसुंदर वाघमारे, प्रा.शरद वंजारे, प्रा.राम गायकवाड,श्री.उत्तम पवार, डॉ.चंद्रकांत साळवे, श्री.एकनाथ मुजमुले, प्रा.अर्जुन राठोड आदी उपस्थित होते.प्राचार्य श्यामसुंदर वाघमारे यांनी आपल्या भाषणात अण्णाभाऊ साठेंच्या 'माझी मैना गावाकडे राहिली' या प्रसिद्ध गीताचा अर्थ सोप्या शब्दांत समजावून सांगितला. त्यांनी सांगितले की, हे गीत फक्त भावनिक गाणं नसून, महाराष्ट्राबाहेर कर्नाटकात राहणाऱ्या मराठी माणसांच्या वेदनांना, त्यांचं दुःख आणि घरापासून दूर राहण्याची खंत यांना आवाज देणारं आहे, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्रा.प्रदीप रोडे यांनी महापुरुषांचे साहित्य आपल्या ग्रंथालयात उपलब्ध आहे, मात्र ते वाचून आपण काय शिकलो आणि त्याचा जीवनात कसा उपयोग केला, हे अधिक महत्त्वाचे आहे. जयंती साजरी करणं ही केवळ औपचारिकता न राहता,



त्या महामानवांच्या विचारांना कृतीत उतरवण्याची प्रेरणा ठरली पाहिजे, असे सांगितले.कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानावर प्रकाश टाकला. प्रा.अंकुश कोरडे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले, तर प्रा. किशोर वाघमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या विशेष कार्यक्रमाला तुलसी शैक्षणिक समूहाच्या विविध युनिट्समधून आलेले सर्व प्राचार्य डॉ.अशोक धुलधुले, प्रा.डी.जी. निकाळजे, सौ.उमा जगतकर, प्रा.बी.डी.राऊत, प्रा.प्रकाश ढोकणे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

### खातेबदलाचे 'पत्ते'

कोकाटे यांच्याच पूर्वीच्या शब्दांतील 'ओसाड गावच्या पाटीलकी' तून त्यांची सुटका झाली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विश्वासू दत्तात्रय भरणे यांच्याकडे या खात्याची जबाबदारी आली.

एकापाठोपाठ एक अशा असंवेदनशील वक्तव्यांची मालिका आणि भर सभागृहातील पत्त्यांचा खेळ यामुळे मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या खुर्चीवर आलेले गंडांतर खातेबदलावर निभावले आहे. कृषी खात्यातून त्यांची रवानगी क्रीडा, युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ या खात्यांमध्ये करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुनावलेले खडे बोल आणि अजित पवार यांनी घेतलेली त्यांची हजेरी या पार्श्वभूमीवर झालेल्या या खातेबदलास 'कारवाई' म्हणावे का, असा प्रश्न पडतो. नाशिकमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा गड लढविणारे अजित पवार यांचे लढाऊ शिलेदार असलेले कोकाटे कृषी खाते मिळाल्यापासूनच वारंवार वाद ओढवून घेत होते. 'ढेकळांचे पंचनामे करायचे का', 'सरकार भिकारी' अशा त्यांची वक्तव्ये प्रसिद्धीझोतात आल्यापासून त्यांच्या नेत्यांच्याही डोळ्यांपुढे तारे चमकू लागले होते.

विधिमंडळाच्या सभागृहात पत्ते खेळत असतानाची त्यांची चित्रफीत झळकली आणि विरोधकांना आयता मुद्दा मिळाला. इथवरचे विषय कदाचित रेटून गेले असते; पण त्याविरोधात आंदोलन करणाऱ्या 'छावा' संघटनेच्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी केलेली मारहाण, ही उंटाच्या पाठीवरची शेवटची काडी ठरली. हे प्रकरण आपल्यावर आणि पक्षावर शेकण्याची शक्यता दिसताच नेतृत्वाचे बैठकांचे सत्र सुरू झाले. खुद्द फडणवीस यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावरून हजेरी घेतली; तसेच अजित पवार यांनीही कानउघाडणी केली. अखेरीस या 'समज' आणि 'खडसावणी'च्या डोंगरातून खातेबदलाच्या कारवाईचे पिल्लू बाहेर पडले आहे. आईचा मार लेकराला लागत नाही, असे म्हणतात, त्याप्रमाणेच आपल्या नेत्यांकडून झालेली ही कारवाई पाहून कोकाटे यांनाही 'गुलाबाचे काटे, तसे आईचे धपाटे'चे प्रत्यंतर आले असेल.

राज्यात तीन वेगवेगळ्या विचारसणीच्या पक्षांच्या महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून काही मंत्री आणि आमदारांवर आरोपांच्या फैरी झडत आहेत. मागचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची बीडमधील हत्या प्रकरण आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे गच्छन्ति झाली. त्यानंतर संजय शिरसाट यांची नोटांनी भरलेल्या बॅगेसह चित्रफीत प्रसिद्ध झाली; तर गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावे डान्स बारचा परवाना असल्याचे उघडकीस आले. भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांनी विधान भवनात 'फ्री स्टाइल' मारामारीची; तर शंभुराज देसाई यांनी सभागृहातच विरोधी आमदारांना 'दबंग'पणाची झलक दाखवली.

मंत्री आणि आमदारांच्या अशा कोणत्याही 'क्रीडा' अंगाला लावून न घेण्याचे कौशल्य नेतृत्वाने साधल्याचे दिसते. कोणावरही आरोप झाले, तरी राजीनाम्याच्या मागणीला भीक घालायची नाही, हा बाणा अपवाद वगळता भारतीय जनता पक्षाने पूर्वीपासून जपला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तर योगेश कदम यांच्या पाठीशीही उभे राहिले; पण अजित पवार 'संवेदनशील' असल्याने त्यांनी होता होई तो कठोर भूमिका घेऊन कोकाटे यांना खातेबदलाची 'कडक' शिक्षा केली. अडचणीची शेती आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसारखी संकटे उभी असताना कोकाटे यांचे वर्तन असंवेदनशील आणि नैतिकदृष्ट्या अयोग्यच होते; पण नोटांची पुडकी सापडणे किंवा बंदी असताना डान्स बारवर पोलिसांचे छापे, हे प्रकार किमान 'चौकशीपात्र' तरी आहेत की नाही, याचे उत्तर देण्याचीही तसदी कुणी घेतलेली दिसत नाही.

## महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभेच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी रामदास पाटील सुमठाणकर

नाशिक ।प्रतिनिधी

वीरशैव लिंगायत समाजातील शिखर संस्था असलेले महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा पुणेच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी संपूर्ण महाराष्ट्रात परिचित असलेले माजी अधिकारी लिंगायत समाज भूषण लाडक नेतृत्व रामदास पाटील सुमठाणकर, दादासाहेब यांची निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा.



या निवडीबद्दल त्यांना नाशिक कार्याध्यक्ष डॉ.संदेश हिंगमिरे, श्री सोमनाथ शेठ घोंगाणे जिल्हा उपाध्यक्ष,अजिंक्य जितेंद्र हिंगमिरे अध्यक्ष महाराष्ट्र वीरशैव सभा नाशिक जिल्हा युवक, सौ संध्या ताई निळकंठ जिल्हाध्यक्ष महिला आघाडी, श्री महेश डबे जिल्हा,श्री सूचित गोंधळे कोषाध्यक्ष,श्री शेखर भायभंग शिक्षण समिती प्रमुख, श्री सचिन धोंडगे(संघटक), श्री राजेश डबे जिल्हा उपाध्यक्ष,श्री महेश साखरे उपाध्यक्ष, सौ,भारती बिडवई महिला प्रमुख नाशिक महानगर, श्री कुणाल दिवटे प्रमुख नाशिक महानगर,श्री रवी लोहारकर कर्मचारी आघाडी प्रमुख,अमोल आढळकर, नारायण दासे,देवानंद सोनटक्के,धीरज वाकोडे,धनराज मस्कले कर्मचारी आघाडी व समस्त महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा नाशिक जिल्हा समिती वीरशैव लिंगायत समाज नाशिक आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## महिला दक्षता समिती प्रमाणे पुरुष दक्षता समिती राज्यात स्थापन करा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुविद्य पत्नी प्रसिद्ध अभिनेत्री अमृता फडणवीस यांना आश्रय सेवा केंद्राच्या वतीने निवेदन - शेख आयेशा

मुंबई /प्रतिनिधी

महिलांवर अत्याचार झाला तर त्यांना न्याय देण्यासाठी संपूर्ण राज्यभरात पोलिस स्टेशन अंतर्गत महिला दक्षता समिती कार्यरत आहे. त्यामुळे पीडित महिलांना न्याय मिळतो.मात्र जे पुरुष स्त्रियांच्या त्रासापासून त्रस्त झालेले आहेत त्यांना न्याय देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने पुरुष दक्षता समिती स्थापन करावी अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपण करावी अशी मागणी आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांनी प्रत्यक्ष भेटून केली आहे.या भेटी मध्ये त्यांनी बऱ्याच वेळ विविध विषयावर सविस्तर सकारात्मक चर्चा केली.



महाराष्ट्रामध्ये महिलांवर अत्याचार होतात.या अत्याचारांना न्याय मिळावा पिढीताना त्रासापासून मुक्तता मिळावी.यासाठी राज्यभरामध्ये पोलीस स्टेशन अंतर्गत महिला दक्षता समिती गठीत करण्यात आलेली आहे. मात्र महाराष्ट्रामध्ये महिलांकडून पुरुषांवर होणारे अत्याचार सुद्धा कमी नाहीत. अशा पीडित पुरुषांना न्याय मिळावा यासाठी राज्यातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत पुरुष दक्षता समिती गठीत करण्यात यावी.अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पोलीस महासंचालक रश्मी शुक्लाजी यांना निवेदन देऊन आश्रय सेवा केंद्राच्या वतीने केली आहे. या मागणीला न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्र्यांकडे साकडे घालावे आणि राज्यातील पीडित पुरुषांना न्याय द्यावा अशी मागणी प्रसिद्ध सुमधुर गायिका, उत्कृष्ठ अभिनेत्री तथा समाजसेविका अमृता फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून केली असल्याचे पत्रकार तथा आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्ष शेख आयेशा यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

अमृता फडणवीस यांची नम्रता अमृताहुनही गोड जाणवली...

महाराष्ट्राचे लोकप्रिय आणि चाणाक्ष मुख्यमंत्री म्हणून ज्यांची जगभर ख्याती आहे अशा देवाभाऊंची सुविध पत्नी प्रसिद्ध अभिनेत्री,सुमधुर गायिका,सामाजिक कार्यकर्त्या अमृता फडणवीस यांनी केवळ भ्रमणध्वनीवर झालेल्या मैत्रीला जागून प्रत्यक्ष मुंबईत भेटीसाठी आमंत्रित केले. प्रत्यक्ष भेटी दरम्यान त्यांनी मोठ्या अज्बीने म्हणाल्या,बीड वरून मला खास भेटण्यासाठी आलेल्या त्या आयेशा कुठे आहेत.असे आपल्या सिक्युरिटी गार्डला विचारत त्यांनी सर्व प्रोटोकॉल बाजूला ठेवून प्रत्यक्ष भेट घेतली. विविध विषयावर बाजूला खुर्ची टाकून सविस्तर बराच वेळ मनमोकळ्या गप्पा मारल्या.आणि पुन्हा आपण भेटत राहू. तुमच्याशी भेटून गप्पा मारू खूप चांगले वाटले. अशी भावना व्यक्त केली.त्यांच्यामध्ये असलेली माणुसकी, आपलेपणा हा अमृताहुनी गोड जाणवला. भेटीचा हा क्षण अविस्मरणीय ठरला.

## मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या दीर्घायुष्यासाठी महाआरती

### लोकराज्य मित्र मंडळ, महाराजा मित्र मंडळ व सकल मराठा समाजाचा पुढाकार

परभणी (प्रतिनिधी): मराठा आरक्षणासाठी अखंड झगडणारे आणि समाजाच्या तळागाळातील गोरगरीब मराठा बांधवांसाठी निःस्वार्थपणे लढा देणारे मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या दीर्घायुष्यासाठी महाआरतीचे आयोजन करण्यात आले.

ही महाआरती शुक्रवार, १ ऑगस्ट रोजी महामृत्युंजय पारदेश्वर मंदिर, परभणी येथे लोकराज्य मित्र मंडळ, महाराजा मित्र मंडळ आणि सकल मराठा समाजाच्या वतीने पार पडली. या आरतीचे आयोजन व्यंकटराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



सध्या मुंबई येथील आझाद मैदानावर मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील उपोषण करत आहेत. उपोषणादरम्यान त्यांच्या तब्येतीत बिघाड झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी व त्यांना दीर्घायुष्य लाभावे, यासाठी ही सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

महाआरतीनंतर उपस्थितांना प्रसाद म्हणून पेढे वाटप करण्यात आले. या वेळी लोकराज्य व महाराजा मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सकल मराठा समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या धार्मिक उपक्रमातून समाजाने मनोज जरांगे पाटील यांच्यावरील विश्वास आणि त्यांच्या लढ्याचे समर्थन पुन्हा एकदा व्यक्त केले.

## मंठा बस स्थानकावर स्वच्छता सर्वेक्षणाची दुसऱ्या टप्प्यातील मोहीम राबवली

डॉ आशिष तिवारी/मंठा

माननीय हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक मोहीम अंतर्गत दि ०१ ऑगस्ट २०२५ रोजी रा. प. परतूर आगार व मंठा बस स्थानकावर दुसऱ्या टप्प्यातील स्वच्छता सर्वेक्षण करण्यात आले.या सर्वेक्षणासाठी बीड विभागातून आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये मा. श्रीमती अनुजा दुसाने (रा. प. विभाग नियंत्रण, बीड), शिवराज कराड (विभागीय वाहतूक अधीक्षक), तसेच गोदाम (आस्थापना पर्यवेक्षक) यांचा समावेश होता.

या सर्वेक्षणात स्थानिक आगार प्रमुख श्रीमती माधुरी देशमुख/ जगताप व विभागीय लेखा अधिकारी श्रीमती चिंतल मॅडम यांनी सक्रिय सहभाग घेतला. सर्वेक्षण दरम्यान




दोन्ही स्थानकांवरील स्वच्छता व्यवस्था, प्रवाशांसाठी उपलब्ध सुविधा, कचरा व्यवस्थापन, शौचालयांची स्वच्छता व त्यांचा प्रत्यक्ष वापर, तसेच स्थानकाच्या एकंदर आराखड्याचा तपशीलवार आढावा घेण्यात आला.

ही मोहीम सार्वजनिक वाहतूक सुविधांना स्वच्छ, सुंदर व प्रवाशांसाठी अधिक सुसज्ज करण्याच्या उद्देशाने राबवली जात आहे. सर्वेक्षण अहवालाच्या आधारे आवश्यक सुधारणा व अंमलबजावणी लवकरच करण्यात येणार असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. याप्रसंगी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वसंतराव वाघमारे, वाहतूक नियंत्रण नारायण बेंद्रे, वाहतूक नियंत्रक संजय खुडे, चालक गजानन दराडे, तराशे




## आशा वर्कर व गटप्रवर्तकांचा आनंदी मेळावा उत्साहात

परभणी (प्रतिनिधी) - आयटक संघटनेच्या वतीने परभणी येथे आशा वर्कर आणि गटप्रवर्तकांचा आनंदी मेळावा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त १ ऑगस्ट रोजी लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात उत्साहात पार पडला. या मेळाव्यात आशा व गटप्रवर्तक महिला कर्मचारी यांच्या विविध मागण्यांबाबत राज्याच्या आरोग्य राज्यमंत्री तथा पालकमंत्री मा. मेघना साकोरे बोर्डीकर यांना साकडे घालण्यात आले.

मेळाव्यात महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा गटप्रवर्तक संघटनेचे राज्य अध्यक्ष कॉ. राजू देसले यांनी आशा सेविका व गटप्रवर्तकांच्या न्यायहक्कांच्या मागण्या मांडल्या. त्यांनी सांगितले की, २००५ पासून कार्यरत असलेल्या आशा वर्कर्सनी कोरोना काळातही सेवा दिली असून, सुरुवातीला केवळ ३०० रुपये मानधन देण्यात येत होते. सध्याच्या स्थितीत थोडा मोबदला वाढला असला तरी, ६० व्या वर्षी त्यांना सेवानिवृत्ती द्यावी, असा निर्णय घेतला गेला आहे, जो अन्यायकारक आहे. यावेळी आशा सेविकांचे सेवानिवृत्ती वय ६५ वर्षांपर्यंत वाढवावे, गटप्रवर्तकांना कंत्राटी कर्मचारी दर्जा द्यावा व आरोग्य विभागात समायोजन करावे, अंशकालीन स्त्री परिचर यांना अर्धवेळ कर्मचारी दर्जा द्यावा, मोबदला २१ हजार रुपये करण्यात यावा, सर्व आशा वर्कर्स व संबंधित कर्मचाऱ्यांना दीपावली भेट द्यावी आदी मागण्या करण्यात आल्या.

या मागण्यांवर उत्तर देताना आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी आशा सेविकांचे सेवानिवृत्ती वय ६५ वर्ष करण्याच्या मागणीवर सकारात्मक विचार करू, असे सांगितले. गटप्रवर्तकांना कंत्राटी कर्मचारी दर्जा, अंशकालीन स्त्री परिचरचा मोबदला वाढ, अर्धवेळ कर्मचारी दर्जा आदी बाबी मंत्रालयात तुमची बहीण म्हणून चर्चेला लावेल, आणि न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहील, असे आश्वासन दिले.

मेळाव्याचे प्रास्ताविक आयटकचे राज्य उपाध्यक्ष मुगाजी बुरुड यांनी केले. आयटक नेत्या माधुरी क्षीरसागर यांनी महिलांच्या मानधन आणि न्यायाच्या लढ्याचे महत्व सांगितले. डॉ. भारत नांदुरे, अब्दुल शेख, विष्णनाथ गवारे, बाबाराव आवरगड, वैजिनाथ शाहणे आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

मेळाव्यात राज्य सदस्य तथा जिल्हा सचिव समता कदम, राज्य सदस्य रमा वावळे, जिल्हा उपाध्यक्ष संजीवनी स्वामी, संघटका शिवमा पांचाळ तसेच कोमल कळे, मडवदरी जोगदंड, चांदणे बचाटे, भालेरावताई, नुजत पठाण, निर्मला कासार, वर्षा बादल यांच्यासह जिल्ह्यातील आशा व गटप्रवर्तक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी पी. वाय. सी. अध्यक्ष-उपाध्यक्ष, विविध तालुक्यांतील गटप्रवर्तक व महिला कार्यकर्त्यांचे योगदान मोलाचे ठरले.

# के.एस.पी विद्यालयामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, बीड अंतर्गत विद्यार्थ्यांना दिले बालविवाह प्रतिबंध कायद्या विषयक धडे




बीड ।प्रतिनिधी

दि.०२/०८/२०२५ रोजी आजच्या बदलत्या काळामध्ये मुलांना बालकांचे अधिकार काय आहेत, बालविवाह केल्यामुळे होणारे दुष्परिणाम या बदल माहिती करून देणे खुप गरजेचे आहे. त्यामुळे शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, बीड अंतर्गत कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमास श्रीमती सातव मॅडम, न्यायाधिश, (जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, बीड), श्री. मंगेश जाधव, (जिल्हा बालसंरक्षण अधिकारी, बीड), श्री. तत्वशिल कांबळे, (अधिकार मित्र) श्री.मिथुन जोगदंड, (अधिकार मित्र) , श्री. ओंकार नाईकवाडे (अधिकार मित्र) यांनी मुलांना खुप छान व सोप्या पध्दतीने माहिती सांगितली. असे की, बालिका मातामृत्यूचे प्रमाण जास्त असते. बालकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो, जसे अल्पवजन, अशक्तता तसेच शैक्षणिक नुकसान विवाहामुळे शिक्षण अर्धवट राहते किंवा थांबते. मुलींना शिक्षणाचे व रोजगाराचे संधी मिळत नाहीत. शिक्षण न झाल्याने आर्थिक स्वावलंबन अशक्य होते. मानसिक परिणाम लहान वयात जबाबदाऱ्या आल्याने मानसिक तणाव, नैराश्य, आत्मविश्वास कमी होतो. भावनिक परिपक्कता नसल्यामुळे वैवाहिक जीवनात संघर्ष होतात.सामाजिक दुष्परिणाम स्त्री-पुरुष समानतेला धोका निर्माण होतो. महिला अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार या घटना वाढतात. गरीब व मागास समाजांमध्ये हा सध्या असलेला दुष्चक्र अधिक मजबूत होतो. आर्थिक परिणाम शिक्षण आणि रोजगाराच्या संधी गमावल्यामुळे कुटुंबाची आर्थिक स्थिती बिघडते. गरीबीतून गरीबीकडे होणारी वाटचाल चालूच राहते.कायदेशीर परिणाम भारतात १८ वर्षांखालील मुलींचा व २१ वर्षांखालील मुलांचा विवाह कायद्याने गुन्हा आहे. अशा प्रकारे माहि ती देऊन अवगत केले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख, श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब तसेच मार्गदर्शक संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत होते.



# क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात अभिवादन

मुंबई ।प्रतिनिधी

क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव दिलीप देशपांडे, राजेंद्र बच्छाव, विजय शिंदे यांच्यासह मंत्रालयीन अधिकारी आणि कर्मचारी यांनी पुष्प अर्पण करून वंदन केले.



# तळणी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

तळणी ।प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील तळणी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला उपसरपंच विश्वनाथ दादा चंदेल, माजी ग्रामपंचायत सदस्य कृष्णा वाघमोडे तसेच अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे ज्येष्ठ सदस्य मधुकर डोंगरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि शौर्याचे प्रतीक महाराणा प्रताप यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमात सर्व समाजबांधवांची आणि विविध जाती-धर्मांतील प्रतिष्ठीत नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती जाणवली.

जयंती उत्सवाच्या आयोजनात कैलास बाजड,पंजाब डोंगरे, विष्णु कांबळे, बालू डोंगरे, नायबराव डोंगरे, शाम डोंगरे, संतोष डोंगरे, सचिन शिंदे, सचिन बाजड, ज्ञानेश्वर डोंगरे, राहुल डोंगरे, गणेश चंदेल आदींचा सहभाग होता.

# छ.संभाजीनगर ते परभणी रेल्वेमार्ग दुहेरीकरणाला मंत्रिमंडळाची मान्यता

## २१७९ कोटींचा प्रकल्प देशाच्या ११,१६९ कोटींच्या बहु-मार्गिकरण योजनेचा भाग

खा.डॉ.कल्याण काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे मोठे यश

जालना ।प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय आर्थिक व्यवहार समितीने रेल्वे मंत्रालयाच्या चार बहुप्रतीक्षित बहु-मार्गिकरण प्रकल्पांना मंजुरी दिली असून, यामध्ये छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)-परभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचा समावेश करण्यात आला आहे. या १८७.२९ किमी लांबीच्या प्रकल्पासाठी २१७९ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, तो २०२८-२९ पर्यंत पूर्ण होणार आहे.

या ऐतिहासिक निर्णयामुळे मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड या जिल्ह्यांतील रेल्वे संपर्कात आमूलाग्र बदल होणार आहे. हा प्रकल्प खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या दृढ इच्छाशक्ती, लोकहिताशी बांधिलकी आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा



ठोस परिणाम आहे. डॉ. काळे यांनी या मार्गाच्या दुहेरीकरणासाठी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे वेळोवेळी ठोस मांडणी करून केंद्र सरकारच्या धोरणात्मक योजनेत ही मागणी समाविष्ट करून घेतली.

देशव्यापी बहु-मार्गिकरण योजनेंतर्गत चार प्रमुख प्रकल्प मंजूर:

१. इटारसी-नागपूर चौथी लाईन २. छत्रपती संभाजीनगर-परभणी दुहेरीकरण ३. आलुबाडी रोड-न्यू जलपाईगुडी तिसरी व चौथी लाईन ४. डांगोअपोसी-जारोली तिसरी व चौथी लाईन या चार प्रकल्पांमुळे १३ जिल्ह्यांतील रेल्वे नेटवर्क सुमारे ५७४ किमीने वाढणार आहे. यामुळे २,३०९ गावांतील सुमारे ४३.६० लाख लोकसंख्येला थेट लाभ मिळणार आहे.

प्रकल्पाचे फायदे: कोळसा, सिमेंट, कृषी उत्पादन, कंटेनर, पेट्रोलियम यांसारख्या मालाच्या वाहतुकीत क्रांती ९५.९१ दशलक्ष टन दरवर्षी अतिरिक्त मालवाहतूक क्षमता २२९ लाख मानव-दिवसांचे प्रत्यक्ष रोजगारनिर्माण तेल आयातीत १६ कोटी लिटर घट, उजह्व उत्सर्जनात ५१५ कोटी किलो घट२० कोटी वृक्षारोपणाच्या परिणामाइतकी हरित ऊर्जा व पर्यावरण लाभ

'गतीशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन'चा भाग

हे सर्व प्रकल्प झच् ऋीेंळडहरज्ञींळ छर-ींळेपरश्र चरीींशी झश्ररप अंतर्गत राबवले जात असून, देशातील मल्टिमोडल कनेक्टिव्हिटी व लॉजिस्टिक कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ करणारे आहेत.

खासदार डॉ. कल्याण काळे यांचे योगदान लक्षणीय

डॉ. कल्याण काळे यांनी खासदार म्हणून निवडून आल्यानंतर सातत्याने छत्रपती संभाजीनगर-परभणी मार्गाच्या दुहेरीकरणासाठी पाठपुरावा केला. त्यांनी संसदेत आणि मंत्रालयात ही गरज ठामपणे मांडून रेल्वे मंत्रालयाच्या धोरणनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावली. आज या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचे फलित जनतेला दिसून येत आहे.

हा निर्णय म्हणजे मराठवाड्याच्या दृष्टीने मैलाचा दगड असून, या भागातील सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासाला नवी दिशा देणारा ठरेल. खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या नेतृत्वातील लोकाभिमुख विकासाचा हा ठोस पुरावा आहे!

# शून्यातून विश्व घडवणारा एक तेजस्वी दीप मालवला

## डॉ. इंदरचंदजी छल्लाणी यांना अखेरचा निरोप

मंठा /प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्याची अमिट छाप सोडणारे डॉ. इंदरचंदजी छल्लाणी यांचे निधन हे केवळ एक वैयक्तिक शोक नसून, एका युगाच्या अखेरचा टप्पा आहे, असे म्हणावे लागेल. आपल्या सुसंस्कारित विचारांनी, सेवाभावी वृत्तीने आणि अद्वितीय कर्तृत्वाने त्यांनी समाजाच्या अंतःकरणात कायमस्वरूपी स्थान निर्माण केले होते.

डॉ. इंदरचंदजी हे रुग्णांसाठी केवळ डॉक्टर नव्हते, तर देवदूतच होते. त्यांनी वैद्यकीय सेवा म्हणजे केवळ उपचार नव्हे, तर एक धर्म आहे, हे आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्पात सिद्ध केले. मंठा व आजूबाजूच्या ग्रामीण भागातील असंख्य रुग्ण त्यांच्या मायेच्या आणि आत्मीयतेच्या शब्दांनी सावरले गेले.



त्यांनी केवळ रोगावर औषध दिले नाही, तर प्रत्येक व्यथित हृदयाला आशेची नवी किरणे दिली. समाजाशी, लोकांशी, आणि विशेषतः तरुण पिढीशी त्यांनी एक हृदयबंध निर्माण केला होता. त्यांच्या विचारांची बीजे त्यांनी आपल्या कुटुंबात, विशेषतः आपल्या मुलांमध्ये रोवली. डॉ. अमरचंद, डॉ. जयनेंद्र, संजय व देवेंद्र या कर्तृत्ववान पुत्रांना त्यांनी सुसंस्कारांची विनम्रतेची आणि अथक परिश्रमाची शिदोरी दिली, आणि त्यांना समाजसेवेच्या वाटेवर उभे केले.

शून्यातून विश्व निर्माण करणारा हा तपस्वी,

आज कालवश झाला,

त्यांचा शब्दही आधार वाटायचा,

म्हणूनच हा विरह असह्य झालाय...

अवघ्या आठ दिवसांपूर्वीच त्यांच्या सहचारिणी, सौ. सरलाबाई इंदरचंदजी छल्लाणी यांचे दुःखद निधन झाले. स्व सरलाबाईनी आयुष्यभर त्यांची सावली बनून पत्निधर्म पाळला . त्यांच्या अचानक जाण्याने स्व डॉ साहेबांची मन:स्थिती अस्थिर झाली आणि त्यांच्या सेवकार्याची आठवण करित त्यांनी देखील जगाचा अखेरचा निरोप घेतला. आयुष्यभर एकमेकांची साथ देणाऱ्या या दाम्पत्याने शेवटची वाटसुद्धा एका मागोमाग जाण्याची स्वीकारली असे म्हटल्यास वावगे वाटू नये

छल्लाणी परिवारावर हे दुःख पहाडासारखं कोसळलं असलं तरी, आई वडिलांच्या आयुष्याचं कार्य व त्याग एक प्रेरणादायी स्मृती म्हणून सदैव त्यांना पथप्रदर्षक ठरेल यात तिळमात्र संदेह नाही. या अमीट सेवाभावी जीवनाला आणि चिरंतन स्मृतीला अखंड ,अनंत श्रद्धांजली.......

शब्दांकन

ज्येष्ठ पत्रकार हरिराम तिवारी (बाबुजी) मंठा, जिल्हा जालना..

# जालना अंकुशराव टोपे महाविद्यालयातील ग्रंथपाल श्रीमती नंदाताई पवळ मॅडम यांच्या सेवानिवृत्त निमित्ताने सेवा गौरव सोहळा संपन्न

जालना ।प्रतिनिधी

अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथील ग्रंथपाल श्रीमती नंदाताई पवळ मॅडम यांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त निमित्ताने सेवा गौरव सोहळा संपन्न झाला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रोफेसर डॉ.दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य प्रा.पांडुरंग खोजे, महाविद्यालयातील स्टाफ सेक्रेटरी डॉ.संतोष करवंदे, पर्यवेक्षक प्रा.रामप्रसाद भालेकर यांच्या शुभहस्ते श्रीमती नंदाताई पवळ मॅडम यांचा सत्कार करण्यात आला.श्रीमती नंदाताई पवळ मॅडम यांच्या पंचवीस वर्षांच्या सेवेमध्ये त्यांनी केलेल्या कार्याची तसेच त्यांची प्रेरणादायी वाटचाल व कार्यनिष्ठा ही त्यांच्या कामाची पोचपावती होती असे गौरव उद्धार प्राचार्य डॉ.दादासाहेब गजहंस यांनी व्यक्त केले.याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.पांडूरंग खोजे, डॉ.कार्तिक



गावंडे,प्रा.रामप्रसाद भालेकर, डॉ.सुजाता देवरे, डॉ.सीमा निकाळजे,श्री.सुरेश ठेंग,सौ.उगले मॅडम,श्री.वाजे सर,सौ.कुरनकर मॅडम,सौ.मुळे मॅडम,व श्रीमती दोरके मॅडम या मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी श्रीमती नंदाताई पवळ मॅडम यांनी जीवनातील खडतर प्रवासामुळे मत्स्योदरी शिक्षण संस्थेमध्ये सेवा करण्याची संधी मिळाली याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.या सेवा सोहळयास महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापिका तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि कुटुंबातील सदस्य व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते



# महिलांना बेल वृक्ष रोपांचे वाटप सुरु यशस्वीनी महिला मंचचा उपक्रम

परभणी (प्रतिनिधी): यशस्विनी महिला मंचच्या वतीने श्रावण मासा निमित्त शहरात महिलांना बेल वृक्ष रोपांचे वाटप सुरु करण्यात आले आहे,संपूर्ण महिनाभर हा उपक्रम सुरु राहणार असून मागेल त्यांना ही रोपे दिली जाणार आहेत अशी माहिती यशस्विनी महिला मंचच्या अध्यक्षा डॉ.संप्रिया राहुल पाटील यांनी दिली.

यशस्वीनी महिला मंचच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. महिलांसाठी आरोग्य शिबिर,बचत गटांचे विक्री व प्रदर्शन भरवले जातात त्यासोबतच महिलांसाठी विविध स्पर्धा देखील घेतल्या जात आहेत. नुकत्याच घेतलेल्या मेहंदी स्पर्धेलाही शहरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आता श्रावण महिना सुरू झाला आहे या निमित्त पर्यावरण संवर्धन आणि बेल वृक्षाचे धार्मिक महत्त्व लक्षात घेता यशस्विनी महिला मंचच्या वतीने शहरात विविध प्रभागांमध्ये बेल रोपांचे वाटप सुरु केले आहे.या आधीही मंचच्यावतीने वृक्षांचे वाटप केले होते.यंदाही हा अनोखा उपक्रम राबवला जात आहे.त्यासाठी रोपे उपलब्ध झाली आहेत.पहिल्या सोमवार पासून वाटप सुरु झाले आहे.मंचच्या सदस्या या महिलांना भेटुन त्यांना रोपे देत आहेत.त्यासोबत मागेल त्या महिलांना रोपे दिली जाणार आहेत.महिलांनी हे वृक्ष आपल्या घरासमोरील मोकळ्या जागेत मंदिर सार्वजनिक जागा या ठिकाणी लावावेत तसेच ज्या महिला वृक्ष लागवड करून त्याचे चांगल्या प्रकारे संवर्धन करतील त्यांना आकर्षक बक्षिसे दिले जाणार आहेत.तरी जास्तीत जास्त महिलांनी या उपक्रमात सहभाग घ्यावा असे आवाहन मंचच्या अध्यक्षा डॉ.संप्रिया राहुल पाटील यांनी केले आहे. यावेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ अंबिका डहाळे, कीर्ती चौधरी, वंदना शर्मा, राजकन्या सोनी, बोबडे मॅडम, शितल खानचंदानी, सुनिता कांबळे, अरुणा मकासरे, उज्वला घाडगे ,संता कसबे व मोठ्या संख्येने यशस्वीनी महिला मंचच्या सदस्या उपस्थित होत्या.

# पीएम किसान सन्मान निधीच्या हप्त्याच्या वितरण कार्यक्रमाचे कृषि विज्ञान केंद्र येथे थेट प्रक्षेपण

## शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती

परभणी /प्रतिनिधी

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली वाराणसी येथे आयोजित प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या २० व्या हप्त्याच्या वितरण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपणाचे आज परभणी येथील कृषि विज्ञान केंद्र येथे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सदर केंद्रात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रशांत भोसले, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, परभणी तसेच प्रमुख पाहुणे म्हणुन कृषि विभाग परभणी येथील अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी परभणी जिल्ह्यातील २५० शेतकरी, शेतकरी महिला व ग्रामीण युवक यावेळी उपस्थित होते.

पीएम किसान सन्मान निधी वितरणाच्या कार्यक्रमामधुन




प्रधानमंत्री यांनी देशभरातील शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी आपल्या भाषणात शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी वचनबद्धतेवर भर दिला. शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब आणि उत्पादन वाढवण्याच्या मुद्यावर त्यांनी संबोधीत केले. तसेच शेतीमध्ये विकसीत करण्यात आलेले आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचविण्यासाठी त्यांनी कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र व कृषि विभाग यांनी समन्वय साधुन संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रम हाती घेण्याच्या सुचना दिल्या. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट दोन हजार रुपये जमा करण्याची प्रक्रिया सुरू केली, ज्यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक आधार मिळाला.

कृषी विज्ञान केंद्र येथे आयोजित कार्यक्रमात डॉ. प्रशांत भोसले यांनी प्रास्ताविक केले. शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, शेतातील उत्पादन खर्च कमी करुन आपले उत्पन्न वाढवावे तसेच कृषि विज्ञान केंद्र, परभणी मार्फत शेतकऱ्यांना कृषि व कृषि संलग्न बाबींसाठी प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, प्रक्षेत्र भेट व इतर माध्यमातुन सर्वतोपरी तांत्रिक माहिती दिली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

शेतकऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या तांत्रिक सत्रांमध्ये मार्गदर्शन करतांना श्री. अविष्कार पाटील, ड्रोन तंत्रज्ञ यांनी कृषि क्षेत्रामध्ये ड्रोनच्या वापराबाबत सविस्तर माहिती दिली कृषि विज्ञान केंद्र येथील शास्त्रज्ञ डॉ. अमोल काकडे यांनी खरीप पिकातील किड व रोग व्यवस्थापनबाबत सविस्तर माहिती देऊन शेतकऱ्यांनी एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन पध्दतींचा अवलंब करावा असे आवाहन केले. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीधर पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यश्स्वीतेसाठी कृषि विज्ञान केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परीश्रम घेतले.

# गावंदरा उपळी रस्त्याची दुर्दशा शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मृत्यूशी झुंज देणारा हा रस्ता

## पायीही चालता येतं नसल्याने विद्यार्थ्यांकडून बुजवण्यात आले रस्त्यावरील खड्डे

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

धारूर तालुक्यातील गावंदरा ते उपळी या रस्त्याची अत्यंत दुर्दशा झाली असून शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे दररोज विद्यार्थ्यांना प्रवास करावा लागत असून हा रस्ता मृत्यूशी झुंज देणारा बनला आहे,या रस्त्यावरून विद्यार्थ्यांना दररोज एसटी बसणे,सायकल वरून व पायी प्रवास करावा लागतो,गावंदरा येथून वडवणी तालुक्यातील उपळी येथे जाण्यासाठी दोन किलो.मीटरचे अंतर असुन शाळेत जाण्यासाठी या रस्त्यावरून गावंदरा येथून शेकडो विद्यार्थी येतात मात्र या विद्यार्थ्यांना अतिशय खड्डेमय झालेल्या या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे झाले असून या खड्ड्यातून एसटी बस चालणेही अवघड होते,त्याचप्रमाणे पायी चालणाऱ्या विद्यार्थ्यांना दुखापत होते सायकलवर जाणाऱ्या विद्यार्थ्यांना ही मोठी दुखापद या रस्त्यावरून कधी कधी होते,याबाबत लोकप्रतिनिधी व बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष होत असल्यामुळे आपल्या बचावासाठी अनेक वेळा विद्यार्थ्यांकडून व शिक्षकाकडून हे खड्डे बुजवण्यात येतात मात्र शासनाच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे लक्ष देण्यास तयार नाही,माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी तेलगाव वडवणी रोड वरिल हाच रस्ता उपळी ते उपळी फाटा इथपर्यंत रस्ता करण्यासाठी पाठपुरावा केला मात्र पुढे उपळी ते गावंदरा याच



रस्त्यावरील भाग असून याकडे आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे दुर्लक्ष होत आहे, यासाठी परिसरातील लोक प्रतिनिधी या प्रश्नाकडे पाठपुराव्या साठी दुर्लक्ष करत आहेत, प्रशासनाकडून अद्याप या रस्त्याची दखल घेण्यात आलेली नाही हा रस्ता मंजूर असल्याचे सांगण्यात येते मात्र अद्यापही कुठल्या कंत्राटदाराला काम दिले अथवा कशामुळे रखडले याचा ठाव पत्ता लागलेला नाही,या प्रश्नाकडे गंभीरपणे लक्ष देऊन लोकप्रतिनिधी आमदार यांनी लक्ष देण्याची मागणी गावंदरा उपळी येथील नागरिकातुन केली जात आहे,किल्ले धारूर ते तेलगाव रस्त्यावर गावंदरा हे गाव असून या गावावरून उपळीकडे जाणारा हा दळण वळणाचा मुख्य रस्ता आहे,वडवणी साठी व बीड साठी जाण्यासाठी मधला जवळचा मार्ग असून यासाठी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी व नागरिकांना दळण वळणासाठी हा मुख्य रस्ता असून या रस्त्याचे काम तात्काळ मार्गी लावावी अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे हा रस्त्याचा प्रश्न मार्गी न लागल्यास धारूर तेलगाव रस्त्यावर आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात येणार असल्याचे समजते.

# डॉ. गजानन देशमुख यांना पीएच.डी. प्रदान व गाईडशिप मिळाल्याबद्दल सत्कार



तळणी ।प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील देवठाणा उस्वद येथील आणि सध्या श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर येथील प्राणीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. गजानन मधुकर देशमुख यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामार्फत पीएच.डी. प्रदान व गाईडशिपची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल तळणी येथे डॉ. देशमुख यांचा गौरव करण्यासाठी श्री कृपा हॉस्पिटल, तळणी येथे सत्कार करण्यात येऊन पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

यावेळी डॉ. रवींद्र देशमुख,माजी केंद्रप्रमुख आसाराम राठोड, सामाजिक कार्यकर्ते विकास देशमुख,रावसाहेब मोरे, विशाल देशमुख, गोर सेनेचे तालुकाध्यक्ष नारायण पवार आदीची उपस्थित होती.यावेळी डॉ. गजानन देशमुख यांचे वडील मधुकरराव देशमुख यांचाही सन्मान करण्यात आला. त्यांचा मुलाच्या यशात असलेला मार्गदर्शक आणि प्रेरणादायी वाटा अधोरेखित करण्यात आला.



माजलगाव :- रिपब्लिकन सेनेचे वैजनाथ गडसिंग यांची तालुका उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.यावेळी लवुळ सोसायटीचे चेअरमन द्वारकादासबप्पा शिंदे व चंद्रकांत शिंदे ग्रामसेवक साहेब,हनुमान गडसिंग,प्रल्हाद शिंगाडे,फकीरा आडागळे, चंद्रकांत आठवे व इतर गावाकऱ्यांनी सत्कार केला.

# दापोलीतून एक राखी जवानांसाठी अभियानाअंतर्गत सीमेवर राख्या रवाना

दापोली /प्रतिनिधी

कै.कृष्णामामा महाजन स्मृतिप्रतिष्ठानच्या 'युवा प्रेरणा कट्टा' टीमने दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील दापोलीत ' एक राखी जवानांसाठी; देशाच्या रक्षकांसाठी ' हा उपक्रम आयोजित केला होता.ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर ज्या भारतीय सैन्य दलानी पहलगाम हल्ल्याचा बदला घेत पाकिस्तानी आंतकवाद्यांना धडा शिकवला त्यांच्या प्रति आदर व्यक्त करणे हा यावर्षीच्या अभियानाचा मुख्य उद्देश होता.

दापोलीतील विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थिनी आणि काही सामान्य नागरिक महिला भगिनी यांनी या उपक्रमात राख्या जमा केल्या. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रमोद



पांगारकर,नचिकेत बेहरे,संदीप गरंडे, श्रीप्रीती वैद्य, साक्षी करमरकर, सुमेध करमरकर , रोहन भावे इ. कार्यकर्त्यांसह युवा टीमने मेहनत घेतली. या उपक्रमाबाबत बोलताना मिहीर महाजन म्हणाले, भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली तेव्हा २०२२ मध्ये प्रथमच या उपक्रमाची सुरुवात आपण करत ७५ हून अधिक शाळा/महाविद्यालयांतून राख्या जमवून सीमेवर पाठवल्या होत्या. तेव्हापासून दरवर्षी हा उपक्रम आयोजित केला जातो.

यावर्षी जमलेल्या राख्या पठाणकोट (पंजाब) येथील भारतीय वायू सेनेच्या हवाई तळावरील जवानांना तसेच मुंबई येथील सशस्त्र सेना सामान चिकित्सा डेपो येथील ऑफिस मध्ये देखील रवाना करण्यात आल्या.

# क्रांतीसिंह नाना पाटिल हे प्रती सरकार स्थापन करुन रयतेची

## सेवा करणारे थोर क्रांतीकारक- गुणवंत एच.मिसलवाड



नांदेड ।प्रतिनिधी

आपला भारत देश स्वातंत्र्य करण्यासाठी अनेक महान क्रांतीकारक झाले, १९४२ च्या नंतर ब्रिटिशांविरूद्ध चले जाव चळवळीला प्रारंभ झाला. अशातच क्रांतीसिंह नाना पाटिल यांनी प्रति सरकार (पत्री सरकार) स्थापन करून आपला कारभार लोकाभिमुख करून आपणच चालवणे हे ध्येय उराशी बाळगून प्रति सरकाराअंतर्गत सांगली, सातारा जिल्ह्यातील पंधराशे खेडी गावातील रयतेची सेवा करणारे थोर क्रांतीकारक म्हणजेच क्रांतीसिंह नाना पाटिल हे होत असे प्रतिपादन एसटि मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री.गुणवंत एच.मिसलवाड यांनी केले.

ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि.०३ ऑगस्ट २०२५ रविवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता झुंजार नेते, पत्रि सरकार निर्माते, इंग्रजांना सळो कि पळो करून सोडणारे, एक धगधगती मशाल, रयतेचे सेवक, महान क्रांतीकारक, प्रेरणादायी व्यक्तीमत्व क्रांतीसिंह नाना पाटिल यांच्या १२५ व्या जयंती निमित्त आयोजिलेल्या अभिवादन कार्यक्रम सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

सर्वप्रथम रापम आगाराचे सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक मा.श्री.श्रीनिवास रेणके यांच्या हस्ते क्रांतीसिंह नाना पाटिल यांच्या प्रतिमेचे पुजन करून, पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मा.श्री. गुणवंत एच.मिसलवाड यांनी पुढे बोलताना आपल्या भाषणात ते म्हणाले की, क्रांतीसिंह नाना पाटिल यांना जेल झाली, नंतर ते भूमीगत राहून प्रति सरकारची सुत्रे हालविली. विनोदाच्या गोष्टींनी व तुफान सेना स्थापन करून युवकांना एकसंघ करून जनजागृती केली. मुंबई येथील शिवाजी पार्कवर भरलेल्या भव्य अशा मेळाव्यात मराठी पत्रकार प्रल्हाद केशव अत्रे यांनी त्यांच्या कार्याप्रती त्यांना क्रांतीसिंह ही पदवी बहाल केली. भारतीय संसदेत दोन वेळा खासदार म्हणून मराठीत भाषण देणारे ते एकमेव खासदार व्यक्ती होते. अशा या महान विभूतींचा तुम्ही-आम्ही सर्वांनीच आदर्श घेवून समाजाप्रती, देशाप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज आहे, असेही ते यावेळी शेवटी आपल्या भाषणात म्हणाले.यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक श्रीनिवास रेणके, पाळी प्रमुख कैलास वाघमारे, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, शिवाई ई-बस कंपनीचे मॅनेजर ज्ञानोबा आढाव, वाहन परिक्षक पंढरीनाथ महाराज मिरकुटे, यांत्रिक सिद्धार्थ जोंधळे, संतोष सोनटक्के, चालक विठोबा वडजे, लिपीक वैशाली कोकणे, श्वेता तेलेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रापम आगारातील कामगार, कष्टकरी कर्मचारी, बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# हरिनाम सप्ताहातुन अध्यात्मिक संस्कार व भक्ती परंपरा जतन होते -राजेंद्र मस्के

बीड ।प्रतिनिधी

अखंड हरिनाम सप्ताहातुन नामस्मरण किर्तन भजनाची भक्ती परंपरा नवीन पिढी पर्यंत पोहचवण्याचे कार्य होते. हरिनाम सप्ताह म्हणजे सात दिवसांचा अध्यात्मिक उत्सव आहे, जो प्रत्येक व्यक्तीला अंतर्मुख करतो आणि समाजाला सकारात्मकतेचा संदेश देतो. त्यामुळे अखंड हरिनाम सप्ताह सामाजिक गरज आहे असे विचार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पोखरी लिंबा येथे अखंड हरिनाम सप्ताह सांगता प्रसंगी उपस्थित भाविक भक्तांसी संवाद साधताना व्यक्त केले.

## पोखरी(लिंबा) हरिनाम सप्ताहास ३० वर्षाची परंपरा..!

पोखरी लिंबा हे बीड जिल्ह्यातील पोखरी गाव हे सामाजिक भान असलेले आदर्श गाव असून लोकवर्गणीतून शैक्षणिक संकुल निर्माण करणारे हे अध्यात्मिक क्षेत्रातही एक दिलाने उपक्रम राबवतात. भक्ती आणि शिक्षणाची गुढी निर्माण करून समाधान च्या दिशेने येथील ग्रामस्थ प्रयत्नशील असतात. बंकटस्वामी मठाचे मठाधिपती महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, बेलेश्वर संस्थानचे तुकाराम महाराज भारती , राजेंद्र मस्के, व हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत काल अखंड हरिनाम सप्ताह सांगता समारोप संपन्न झाला. परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या पमाणात

सहभागी झाले होते.आध्यात्मिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच बिबीशन मुळीक दत्तू दळवे, शाहू फाळके, अशोक फाळके दादासाहेब खिल्लारे, नवनाथ खिल्लारे, विष्णू साबळे, नवनाथ आडके छत्रभुज फाळके आदींनी बहु परिश्रम घेऊन हा सोहळा यशस्वी केला.



**किल्ले धारूर ।प्रतिनिधी**

**किल्ले धारूर येथे आयोजित चला एक दिवस पर्यावरण रक्षणासाठी देऊया आणि एक झाड लावूया या उपक्रमांतर्गत धारूर न्यायालय परिसरामध्ये वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमामध्ये राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्स, कमवा व शिका योजनेचे विद्यार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उस्फूर्तपणे सहभागी झाले.**

**तसेच धारूर शहरातील रयत मित्र संघटना, पर्यावरण समृद्धी मंच, पा. बा. सावंत प्रतिष्ठान, सृष्टी व संवर्धन संघटना, डॉक्टर महिलांचे झाडांची भिशी, बीड, धारूर शहरातील संस्था यांनी यामध्ये सहभाग घेतला. तसेच बीड जिल्ह्यातील सर्व पर्यावरण प्रेमी, वृक्षप्रेमी, पर्यावरणीय संघटना, कार्यकर्ते या सर्वांनी उत्स्फूर्तपणे वृक्षारोपणात सहभागी होऊन चला एक दिवस पर्यावरण रक्षणासाठी देऊया आणि एक झाड लावूया या उपक्रमात सहभागी होऊन वृक्षारोपण केले. याप्रसंगी धारूर न्यायालयाचे न्यायाधीश मा. वाली साहेब, न्यायालयातील सर्व कर्मचारी, धारूर पोलीस स्टेशनचे पीआय श्री. वाघमोडे साहेब, पोलीस स्टेशनचे कर्मचारी, राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, कमवा व शिका योजनेचे समन्वयक प्रा. नागोराव वाघमारे, कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी सहभागी एनसीसी कॅडेट्स व रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी अभिनंदन केले.**

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बँक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).




# शिक्षण विस्तार अधिकारी तुळशीदास कोकणे व शिवाजी कसरे यांनी युवा पिढीला मदत व मार्गदर्शन करावे - आ.सुरेश धस

आष्टी - (प्रतिनिधी) तुळशीदास झुंबर कोकणे (शिक्षण विस्तार अधिकारी, ग. शि. अ. कार्यालय, पाटोदा) व शिवाजी विठ्ठल कसरे (शिक्षण विस्तार अधिकारी, ग. शि. अ. कार्यालय, आष्टी) हे नियत वयोमानानुसार वयाची ५८ वर्ष पुर्ण झाल्यामुळे दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. या निमित्ताने त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा रविवार दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वा. मोरेश्वर मंगल कार्यालय, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आमदार सुरेश आण्णा धस हे उपस्थित होते. तर विशेष अतिथी म्हणून मा. जि. प. सदस्य देविदास आबा धस, मा. जि. प. सदस्य माऊली आप्पा जरांगे हे उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी बीड मनोरंजन धस, शिक्षण विस्तार अधिकारी आष्टी सुरेश पवार, अध्यक्ष स्वामी विवेकानंद शि. स. प. म. कडा मारूती पठाडे, उपाध्यक्ष स्वामी विवेकानंद शि. स. प. म. कडा अशोक लटपटे, सचिव स्वामी विवेकानंद शि. स. प. म. महेशकुमार शिंदे, लहानू कुमठेकर मामा, एम. डी. पवार, गरकळ सर, शेळके सर हे उपस्थित होते.

सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवपूजन करण्यात आले. यावेळी कु. श्रेया हिने शिवगर्जना सादर केली. तद्नंतर अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा पुस्तक व गुलाबपुष्प देवून सन्मान करण्यात आला. तसेच यावेळी आ. सुरेश आण्णा धस व प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते शिक्षण विस्तार अधिकारी तुळशीदास कोकणे व शिवाजी कसरे यांचा सपत्नीक उभा पोषाख देवून सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या वतीने सन्मानपत्र देवून दोघांचाही सन्मान करण्यात आला.

यावेळी अध्यक्षस्थानावरुन बोलतांना आ. सुरेश धस म्हणाले की, तुळशीदास कोकणे व शिवाजी कसरे यांचे शैक्षणिक कार्य अतिउत्कृष्ट तर होतेच पण ते उच्च शिक्षित होते तसेच जुने अनुभवी शिक्षक होते. यापुढील काळात त्यांनी त्यांचे शैक्षणिक काम बंद न करता युवा पिढीला शैक्षणिक कार्यात मदत व मार्गदर्शन करावे. तसेच सध्याचे बदली धोरण नसून बदला धोरण आहे. यातील त्रासदायक गोष्टींसाठी आगामी अधिवेशनात आवाज उठविणार असून वास्तविक पहाता पाच टक्केच बदल्या झाल्या पाहिजेत. त्यामध्ये तिन टक्के विनंती बदल्या व दोन टक्के तक्रारी बदल्या असाव्यात. या सर्व पाच टक्के बदल्या जिल्हास्तरावर न होता राज्यस्तरावरुनच व्हाव्यात असेही शेवटी ते म्हणाले.

तद्नंतर तुळशीदास कोकणे व शिवाजी कसरे यांनी आपली मनोगते व्यक्त करतांना शैक्षणिक कार्यकाळात सहकार्य करणारांचे श्रुण व्यक्त करुन सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी मा. जि. प. सदस्य देविदास आबा धस यांनी आपले मनोगत व्यक्त करुन दोघांच्याही कार्याचा आढावा घेवून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच यावेळी जे. शि. वि. अधिकारी मनोरंजन धस यांनी आपले मनोगत व्यक्त करुन तुळशीदास कोकणे व शिवाजी कसरे यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी कु. कशिश अवधूत पंडित, श्रीम. वर्षा कसरे, संदिप कोकणे, आण्णासाहेब घोडके, डॉ. विजय सावंत, मारुती पठाडे यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

सदरील गुणगौरव सोहळ्यास पतसंस्थेचे संचालक आप्पासाहेब काळे, प्रविण मेहेरकर, चंद्रशेखर खाडे, रत्नाकर चव्हाण, स्वानंद थोरवे, पोपट बोराडे, विठ्ठल शिंदे, गोरक्ष गोरे, नितिन करडुळे, ज्योतीराम देसाई, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे, आण्णासाहेब साबळे, संतोष दाणी, राजेंद्र लाड, गंगाराम घुमरे, सुर्यभान धुमाळ, राहूल कसरे, प्रशांत पठाडे, राजकुमार थेटे, पद्मनाथ गर्जे, चंद्रकांत शिंदे, गोरक्षनाथ लाड, उमेश झांबरे, विकास साळवे, नवनाथ भोरे, विठ्ठल जगताप, किरण गव्हाणे, रविंद्र भणगे, अरुण खुळपे, सुर्यभान पठाडे, मच्छिंद्रनाथ जगताप, रविंद्र भोसले, सुभाष बांगर, रघुनाथ मुटकुळे, रघुनाथ खंडागळे, सुनिल काकडे, दत्तात्रय घोरपडे, जगन्नाथ सोनवणे, शिवाजी पांढरे, रामभाऊ खाडे, गोविंद चव्हाण, हनुमंत मुटकुळे, प्रभाकर लाड, नेमाजी लटपटे, सुनिल राठोड, गोरख करांडे, शहादेव पिंपळे, सोपान काकडे, जनक पोकळे, शेख आरिफ, थोरवे महेश, प्रमोद तावरे, अशोक शिंदे, सुनिल पन्हाळे, मिलींद नेटके, परमेश्वर जगताप, सतिश पोले, बाबा चव्हाण, विलास मोरे, आनंद मोरे, विशाल चव्हाण, अल्ताफ शेख, अफजल शेख, सतिश दळवी, रमेशसिंह भगत, रमाकांत तरटे, तान्हाजी भगत, गणेश निकम, मधुकर धुमाळ, प्रा. दत्तात्रय नरसाळे, सय्यद सल्लाउद्दीन, पाथरकर सर, अर्जुन खंडागळे, नानासाहेब गायकवाड, बाळासाहेब बन्सोडे, सुभाष भादवे, सोमनाथ वाळके, रामभाऊ घुले, प्रल्हाद खाडे, श्रीम.सुनिता उगले, श्रीम. वर्षा कसरे मॅडम, श्रीम. शितल अरुण धुमाळ, गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी, आजी - माजी शिक्षण विस्तार अधिकारी, आजी - माजी केंद्रप्रमुख, आजी - माजी मुख्याध्यापक, आदर्श शिक्षक, शिक्षिका, माजी संचालक, नातेवाईक, मित्रमंडळी तसेच राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील मान्यंवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकात मुख्याध्यापक जगन्नाथ सोनवणे यांनी तुळशीदास कोकणे व शिवाजी कसरे यांच्या आजपर्यंतच्या शैक्षणिक सेवेचा लेखा - जोका मांडला. या सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे बहारदार सुत्रसंचलन आदर्श शिक्षक बाळासाहेब तळेकर यांनी तर आभार गणेश शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शशिकांत खाडे यांनी मानले. तरी हा सेवापूर्ती गुणगौरव सोहळा यशस्वी होण्यासाठी केंद्रीय मुख्याध्यापक व सर्व घटक शाळा केंद्र बेलगाव, जि. प. मा. शा. चकलांबा, अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती बीडसांगवी, चकलांबा यांनी कठोर परिश्रम घेतले. शेवटी सुरुची भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# जिल्हाभरात ‘हरित बीड अभियान’ जोरावर !

## ७ ऑगस्ट रोजी उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते खंडेश्वरी देवी परिसरात होणार वृक्षारोपण

पर्यावरण रक्षण व हरितक्रांतीचा संदेश देणाऱ्या ‘ हरित बीड अभियानां ’तर्गत जिल्ह्यातील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे . येत्या ७ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते खंडेश्वरी देवी मंदिर परिसरात वृक्षारोपण होणार आहे .

या अभियानाचा मुख्य उद्देश एक दिवसात ३० लाख वृक्षारोपणाचा संकल्प असून , या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी जिल्हा प्रशासन , विविध विभाग , शाळा , महाविद्यालये , स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचे सक्रिय योगदान अपेक्षित आहे .या उपक्रमासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान , रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी प्रबोधय मुळे , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि अन्य सर्व विभागांचे अधिकारी-कर्मचारी सज्ज आणि कटिबद्ध आहेत . त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात एक ऑगस्ट रोजी सायंकाळी सर्व विभाग प्रमुख यांची जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठक घेतली . बैठकीस जिल्हा कृषी अधिकारी , सर्व तालुका कृषी अधिकारी , सर्व गटविकास अधिकारी , सर्व मुख्याधिकारी , सर्व तहसीलदार उपस्थित होते .




यावेळी बोलताना जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की बीड जिल्हा हा तसा ओरडवाहू जिल्हा आहे . पावसाचे प्रमाण कमी आहे . जंगलाचे प्रमाण अत्यल्प आहे . अशा परिस्थितीत झाडे लावणे आणि झाडे जगवणे ही प्रत्येकाची प्राथमिक जबाबदारी ठरते . प्रत्येक विभागाने झाडे लागवडीचे नियोजन करावे. रोपे कुठून आणावीत , कशा पद्धतीने ती पोहोच करावीत , रोपे लावण्यासाठी खड्डे करण्याचे नियोजन कसे करावे , तसेच प्रत्येक रोप लावल्यानंतर क्यू आर कोड द्वारे कशाप्रकारे रजिस्ट्रेशन करावे याबाबत त्यांनी सविस्तर सूचना दिल्या . यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान यांनी सर्व गटविकास अधिकारी यांनी ग्राम पातळीवर विस्तार अधिकारी , ग्रामपंचायत अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे . तसेच पुढील कालावधीत खड्डे खोदणे आणि रोपे पोहोच करणे इत्यादी कामे करून घेणार असल्याचे नमूद केले .

या अभियानाची एक विशेषता म्हणजे एक पेड माँ के नाम हा भावनिक आणि सामाजिक संदेश . पर्यावरणाचे रक्षण करताना आपल्या मातेच्या स्मृतीस वंदन करणारा हा संकल्प विद्यार्थी व नागरिकांमध्ये चांगलाच रुजतो आहे .

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वीरित्या राबविता येईल यासाठी त्यांची सर्व यंत्रणा कार्यान्वित केली आहे . स्वतः त्यांनी पालवन येथील वनविभागाच्या जागेस गुरुवारी भेट दिली . तेथे सुरू असलेल्या खड्डे खोदण्याच्या कामाची पाहणी केली यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी देविदास गाडेकर व त्यांचे सहकारी उपस्थित होते . देविदास गाडेकर यांनी नमूद केले की आम्ही येथे रोपे आणून सात तारखेला वृक्षारोपण करणार आहोत .बीड जिल्ह्याच्या विविध भागांमध्ये हजारो ठिकाणी वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यात येणार असून , त्यासाठी नियोजन , जागा निवड , रोपांची उपलब्धता आणि जनजागृती यावर भर देण्यात आला आहे



# ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राबवल्या जाणाऱ्या

## सेवा पंधरवड्यात पाटेगाव ता.बीड येथे शालेय साहित्य व वृक्ष लागवड :-गणेश लांडे यांचे आयोजन

प्रतिनिधी / बीड

भारतीय जनता पक्षाच्या नेत्या मा. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येणाऱ्या सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत पाटेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन बऱ्हाणपूरचे उपसरपंच गणेश लांडे यांनी केले होते. सामाजिक क्षेत्रात सक्रीय असलेल्या लांडे यांनी ग्रामपातळीवर उपयुक्त उपक्रम राबवत पंकजाताईंच्या कार्यप्रेरणेचा जागर घडवला. कार्यक्रमाला गोरख कदम, परमेश्वर कदम, हरिभाऊ कदम, आकाश कदम, गोकुळ कदम, सुदाम अनिल, आबासाहेब आठवले, सुदाम तात्या कदम, बापू डोळस, गोविंद कदम, महेश कदम तसेच शाळेचे मुख्याध्यापक मुंडे सर व कुलते सर यांची उपस्थिती लाभली होती. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून पालक व ग्रामस्थांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

# माझ्या खात्याकडे बजेट नाही, भर सभेत पंकजा मुंडेंची खदखद

राज्यात सध्या महायुतीचे सरकार असले तरी सत्तेत असलेल्या तिन्ही पक्षांत वेगवेगळ्या कारणांमुळे संघर्ष पाहायला मिळालेला आहे. मंत्र्यांचा एकमेकांच्या खात्यांतील हस्तक्षेप आणि खात्यांना मिळणारा निधी अशा वेगवेगळ्या मुद्द्यांवरून या तिन्ही पक्षांतील अनेक नेत्यांनी आतापर्यंत नाराजी व्यक्त केलेली आहे. दरम्यान, आता पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनीदेखील माझ्या खात्याकडे बजेट नाही अशा शब्दांत आपली खदखद व्यक्त केली आहे. तसेच शासनाने आम्हाला थोडी मदत करावी, अशी मागणीही त्यांनी केलीय.

पंकजा मुंडे नाशिक दौऱ्यावर होत्या. यावेळी



एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी माझ्या खात्याकडे निधी नाही, अशी खंत व्यक्त केली. पंकजा मुंडे

सध्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धनमंत्री आहेत. नाशिकमधील कार्यक्रमात पंकजा त्यांच्याकडे असलेल्या खात्याविषयी बोलत होत्या. याच वेळी बोलत असताना शासनाने आम्हाला थोडी मदत करावी. माझ्या खात्याकडे बजेट नाही, असं पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. पुढे बोलताना पंकजा मुंडे यांनी त्यांच्याकडे असलेल्या खात्याबद्दल आणि त्या खात्याला मिळणाऱ्या निधीबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या. आम्ही सिईटीपी प्लांट आम्ही उभारू, पण शासनाने आम्हाला थोडी मदत करावी. माझं काम पोलिसासारखे शिट्टी वाजवण्याचे आहे. माझ्या खात्याकडे बजेट नाही.

# लष्कर-ए-तौयबापेक्षाही भयानक संघटना परळीत - खा. बजरंग सोनावणे

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडेंनी काही दिवसापूर्वी न बोलण्याची डबल सेच्युरी झाली, २०० दिवस न बोलता काढले, असं विधान करतानाच वैर माझ्याशी होत, तर बदनामी बीड जिल्ह्याची का केली ?अशा सवाल करत विरोधकांना फटकारल होत. पण यानंतर आता शरद पवारांच्या पक्षाचे खासदार बजरंग सोनावणे यांनी धनंजय मुंडेना करारा जवाब देतानाच धक्कादायक दावा केला आहे.

बीडमध्ये महादेव मुंडे हत्या प्रकरणी शुक्रवारी (ता.१ऑगस्ट) सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींची बैठक पार पडली. याच बैठकीत मनोज जरांगे यांनी आठ दिवसात महादेव मुंडे हत्या प्रकरणातील आरोपींना अटक केली नाही, तर बीड बेमुदत बंद राहणार, असा इशारा दिला आहे.याचदरम्यान,आता बीडचे खासदार बजरंग सोनावणे यांनीही बीड जिल्ह्यातील परळीबाबत खळबळजनक दावा केला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील लष्कर-ए- तोयबापेक्षाही भयानक संघटना परळीत आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी धनंजय मुंडेना जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. ते म्हणाले, आंतरराष्ट्रीय लष्कर ए तोयबापेक्षाही भयानक संघटना परळीत आहे. पण याच्यावर आम्ही बोलल की, माझ्या मातीला बदनाम करु नका, माझ्या जातीला बदनाम करू नका. इतकी नौटंकी असा जोरदार प्रहार बजरंग सोनावणे यांनी धनंजय मुंडेंवर केला. असल्याचं सोनवणे म्हणाले आहेत.

सोनावणे म्हणाले, संगीत डिगोळे असेल किंवा किशोर फड... ४० खून या परळीत झालेत. याची साधी नोंदसुध्दा नाही. तुमच्या आमच्या सर्वांच्या सहकार्यानं आणि कर्तृत्वान हे चार खून फक्त उघडकीस आलेत,असही खासदार सोनावणे यांनी सांगितलं.बीडमधील महादेव मुंडे हत्या प्रकरणात पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. आणि पुढच्या काही तासांतच पाच



संशयितांना स्थानिक गुन्हे शाखेनं ताब्यात घेतलं आहे. महादेव मुंडेंची निर्घृणपणे हत्या होऊन तब्बल २१ महिने उलटले आहेत. त्यानंतर ही पहिलीच कारवाई झाली आहे. तसंच संशयित आरोपी गोट्या गित्तेला ताब्यात घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक रवाना झाले आहेत.

# शेवगाव चे भूमिपुत्र संतोष काकडे यांची अमरावती विभागीय पातळीवरील ‘उत्कृष्ट तहसीलदार’ पुरस्कार

## विभागीय आयुक्त श्रीमती श्वेता सिंघल यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला

अहिल्यानगर (प्रशांत बाफना)

महसूल दिनाच्या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयाने सन २०२५ साठी ’उत्कृष्ट अधिकारी/कर्मचारी’ निवड आणि सन्मान सोहळ्याची घोषणा केली आहे. या मध्ये शेवगावचे भूमिपुत्र सध्या चिखली येथे तहसीलदार म्हणून कार्यरत असलेने संतोष सुमन दामोधर काकडे यांची वर्षभरातील त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विभागीय पातळीवर उत्कृष्ट तहसीलदार म्हणून निवड करण्यात आली आहे.

महसूल दिनी विभागीय आयुक्त अमरावती विभाग श्रीमती श्वेता सिंघल मॅडम यांच्या हस्ते दिनांक १ ऑगस्ट महसुल दिनी पुरस्कार प्रदान केला आहे

महाराष्ट राज्याला जिवंत सात बारा योजना प्रभावी राबविणारे कर्तव्य दक्ष अधिकारी म्हणून कार्यरत असलेले तहसीलदार संतोष काकडे यांनी विविध निकषांवर आधारित मूल्यमापनात

प्रभावी कामगिरी करत एकूण १३० पैकी ११७ गुण मिळवले. त्यांच्या निवडीमुळे महसूल प्रशासनातील त्यांची कार्यनिष्ठा आणि कार्यक्षमतेची पोचपावती मिळाली आहे. माहिती तंत्रज्ञानदृष्ट्या अद्ययावत ज्ञान वापरून दैनंदिन कामकाजात त्याचा विशेष उपयोग करतात. प्रशासनाला गती देण्यासाठी त्यांनी नवनवीन संकल्पना राबविल्या असून त्यामुळे कामात सुसूत्रता आणि वेग आला आहे. विविध दाखले देण्यासाठी त्यांनी गावोगावी तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये

शिबिरे आयोजित करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. त्यामुळे नागरिकांना आवश्यक कागदपत्रे मिळवणे सोपे झाले आहे. पाणीटंचाई आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात त्यांनी तालुक्यात परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न केले, ज्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे काढून टाकण्यासाठी त्यांनी विशेष कामगिरी केली असून, अनधिकृत बांधकामांना आळा घालण्याच्या दृष्टीनेही त्यांची कामगिरी प्रशंसनीय आहे.

निर्धारित केलेल्या उद्दिष्टानुसार तपासणीचे काम पूर्ण करण्यासाठी ते प्रयत्नशील असतात. तसेच, न्यायालयीन आणि दंडाधिकारीय कामे सक्षमपणे आणि विहित कार्यपद्धतीने हाताळतात. निवडणुका, जनगणना, कृषीगणना आणि शासनाने वेळोवेळी सोपवलेल्या कामांमध्येही त्यांनी विशेष आणि उल्लेखनीय कामगिरी केली आहे. दप्तर दिरंगाई टाळण्यासाठी आणि ई-गव्हर्नन्स राबविण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. संतोष काकडे यांच्या या निवडीमुळे चिखली तालुक्याचे नाव उज्ज्वल झाले असून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.त्यांच्या निवडी बद्दल सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे

# कार्यक्षम नेतृत्व भीमराव वायवळ यांची भाजप जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती

परभणी/प्रतिनिधी,

तळागाळातील जनमानसात संपर्क आणि सामाजिक शैक्षणिक कार्या सोबतच संघटनात्मक पक्ष बांधणीत बूथ पासून सक्रिय योगदान देणारे भीमराव वायवळ यांची आज भारतीय जनता पक्षाच्या ग्रामीण सरचटणीस पदी (महामंत्री) नियुक्ती झाल्याबद्दल मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला.



एक कुशल संघटक म्हणून त्यांनी सामाजिक नाळ जुळवून अनेकांच्या आडी अडचणी सोडवल्या आहेत. परभणी शहर महानगर पालिकेत सदस्य (प्रतिनिधी ), सभापती समाज कल्याण शहर सुधार पदावर पाच वर्ष, संजय गांधी निराधार समिती सदस्य, विशेष कार्यकारी अधिकारी, आंबेडकर एज्युकेशन ग्रुप महाराष्ट्र सदस्य, बुद्धास लाईट इंटरनॅशनल असोसिएशन चाप्टर महाराष्ट्र सदस्य,

उदय लक्ष्मी चारिटीबल ट्रस्टच्या माध्यमातून अनुसूचित जाती जमाती विद्यार्थ्यांच्यासाठी परभणी व हिंगोली येथे प्रशिक्षण केंद्र, व कौराजी पाटील कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय धनगर टाकली येथे शैक्षणिक क्षेत्रातून ते योगदान देत आले आहेत. सावित्रीबाई फुले बालसंगोपन केंद्राच्या मध्यातून २०० निराधार मुलांचे संगोपन पाठपुरावा

भिवा हेल्थ क्लब आणि सारनाथ सोशल वेलफेअर सोशल फाउंडेशन अध्यक्षपद भूषवित आंतरराष्ट्रीय भिक्खू संघांना आमंत्रित करून बौद्ध धम्म परिषदांचे आयोजन सामूहिक विवाह सोहळ्याचे देखील त्यांनी आयोजन केले होते.